# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ६४–२०१०/ दिनांक :

श्री. गोरख भाऊ खडतरे
मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## <u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गोरख भाऊ खडतरे, मु. पो. कोसारी, ता. जत, जि. सांगली यांनी वीज कनेक्शन मिळावे व जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबद्दल भरपाई मिळावी म्हणून प्रथमत: अंतर्गत कक्ष सांगली यांचेकडे दि. ६.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीतील निर्णय मान्य न झाल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर यांच्याकडे दि. ९३.२०१० रोजी ‘ अ ‘ फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली आहे. तक्रार दाखल करुन घेवून मंचाने आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करुन दि. ३.५.२०१० रोजी सुनावणीची तारीख निश्चित केली. सुनावणीच्यावेळी तक्रारदार ग्राहक उपस्थित नव्हते, वि.प.चे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

ग्राहकाचा तक्रार अर्ज, त्यासोबतची कागदपत्रें, अंतर्गत कक्षाचा निर्णय, मुद्देनिहाय अभिप्राय व सुनावणीच्यावेळी हजर केलेले कागद याचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे.

श्री. गोरख भाऊ खडतरे यांनी दि. ९.२.२००९ रोजी आवश्यक ती रक्कम वि.प.कडे जमा केलेली सोबतच्या पावतीवरुन दिसून येते. तसेच त्यांस वि.प.ने सहमती दर्शविली आहे. तथापि मुद्देनिहाय अभिप्रायात दिनांक नोंदवितांना दि. ९.२.२००९ च्या ऐवजी ९.२.२०१० असे नजरचुकीने नोंदविले असल्याचे वाटते. तथापि, ग्राहकाने चाचणी अहवाल अद्यापही दिला नसल्याने खातरजमेसाठी वि.प.ने ग्राहकाच्या मागणी जागेची संयुक्त तपासणी केल्याचा कागद सुनावणीचेवेळी मंचात दाखल केला आहे. वि.प.कडून वरील तारखेची नोंद करतांना नजरचुकीने तारीख चुकली असेल असे मंचाने नमूद केले आहे. तथापि सदरच्या संयुक्त तपासणी अहवालातील वि.प.ने केलेली अक्षम्य चूक निदर्शनास येत आहे. एकंदरीत सारासार विचार करता वि.प. मंचसमोर सादर होत असतांना कोणत्याही प्रकारच्या कागदपत्रांची तयारी किंवा ग्राहकाची मूळ मागणी या बाबत सतर्क नसल्याचे मंचाचे मत झाले आहे. एकाच प्रकरणात दोन वेगवेगळ्या चुका करणे हे वि.प.कंडून मंचास अपेक्षित नाही. अंतर्गत कक्षामधील तक्रार नोंदवितांना शेतीसाठी वीज पुरवठा हवा असल्याचे ग्राहकाने नमूद केल्याचे अंतर्गत कक्षाने आपल्या निकालात नोंदविले आहे. तसेच सदरच्या संयुक्त तपासणी अहवालातही पैंसे भरल्याची तारीख ९.२.२०१० च नोंदविली असल्याने मंच सर्व नोंदी जाणीवपूर्वक बघून त्यावर निर्णय करीत आहे. त्यामुळे दि. ९.२.२००९ रोजी रक्कम भरली आहे हे गृहीत धरुन चाचणी अहवाल दिल्यानंतर १५ दिवसंनी कनेक्शन देण्याचे वि.प.ने सुनावणीच्या दरम्यान कबूल केले आहे. या बाबी मंच अमान्य करीत आहे, कारण वरील तारखा व नोंदी चुकीच्या देवून मंचाची दिशाभूल करण्याचा वि.प.चा प्रयत्न असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे वाहिनीचा विस्तार गृहीत धरुन दि. ९.२.२००९ ला रक्कम भरली ती तारीख निश्चित करुन दि. ८.५.२००९ पर्यंत जोडणी देणे हे वि.प.चे कर्तव्य होते, त्या कर्तव्यापासून वि.प. बाजूस गेला आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे दि. ८.५.२००९ ते वीज जोडणी देईपर्यंतचा कालावधी भरपाई देण्यास योग्य आहे. त्यामुळे आजमितीस दि. ८.५.२००९ ते न्याय निर्णय होईतोपर्यंत म्हणजेच दि. ३१.५.२०१० हा कालावधी प्रथमत: विलंबासाठी निश्चित करुन त्या पुढील कालावधीत वीज जोडणी देईपर्यंतचा कालावधी अधिक करावा लागेल. त्यामुळे प्राथमिक स्तरावरील विलंब ५६ आठवडे प्रति आठवडा रु. १००/- याप्रमाणे रु. ५६००/- अधिक दि. ३१.५.२०१० नंतर वीज जोडणी देईपर्यंतचा कालावधी अधिक करुन वि.प.ने अशी एकत्रित रक्कम ग्राहकास अदा करावी. तसेच सत्वर वीज जोडणी देणेत यावी.

## आदेश

१) वर तपशिलात निवेदन केल्याप्रमाणे रु. ५६००/- अधिक पुढील कालावधीतील विलंब अशी एकत्रित रक्कम वि.प.ने ग्राहकास विलंब भरपाई म्हणून द्यावी.

२) वीज जोडणी दिल्यानंतर सलग दोन बिलींग सायकलमध्ये वरीलपैंकी रकमेचे समायोजन करुन बाकीची रक्कम चेकने ग्राहकास द्यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :